# आकाशवाणी नागपूर,
# (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# रविवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

1. लाडकी बहीण योजनेमुळे बहिणींना आता कुणापुढे हात पसरण्याची गरज उरणार नाही, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन.
2. मुंबई 26-11 च्या दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर हुसैन राणाला भारताच्या ताब्यात देण्याचा अमेरिकेच्या अपील न्यायालयाचा निर्णय.
3. चंद्रपूर वन प्रबोधिनीला नागरी सेवा प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय थ्री स्टार मानांकन प्राप्त.

आणि

4. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रजांच्या नावानं मराठी भाषा अध्यासन सुरू करण्यासाठी निधी देण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन.

****

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना

महाराष्ट्रातल्या बहिणींना आता कुणापुढे हात पसरण्याची गरज उरणार नाही, कारण त्यांच्या तीन भावांनी त्यांना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न केलेला आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सातारा इथं दिली. महिला सशक्तीकरण अभियानात ते बोलत होते. काही सावत्र भाऊ या योजनेला विरोध करत न्यायालयात गेले आहेत, त्यांना उत्तर द्या, असं आवाहन त्यांनी केलं. ही योजना थांबणार नाही, आमच्या लाडक्या बहिणींना आम्ही दिलेला हा माहेरचा आहेर आहे, असं शिंदे यांनी सांगितलं. सातारा येथील सैनिक स्कूलच्या मैदानावर आयोजित मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी महिलांच्या सन्मान सोळ्यात ते बोलत होते. आपल्या आशिर्वादाने सरकारची ताकद वाढली कि या योजनेतील रक्कम तीन हजार पेक्षा जास्त करण्याचा मानस असून ती दानत आमच्यात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितलं. बहिणींना आत्मनिर्भर करण्याचा छोटा प्रयत्न आम्ही भावांनी केला आहे. सावत्र भावांनी योजनेत खोडा घालण्याचा प्रयत्न केला. बहिणींनो त्यांना धडा शिकवा, असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं. दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अकोला जिल्ह्यातील अडीच लाखांहून अधिक महिला पात्र ठरल्या असून, योजनेच्या पहिल्या दोन महिन्यांचा लाभ त्यांच्या खात्यात जमा होत आहे.

अनेकांच्या खात्यात यापूर्वीच हा लाभ पोहोचला. त्याबद्दल अनेक महिलानी आनंद व्यक्त केला असून, शासनाला धन्यवाद दिले आहेत.

तहव्वूर हुसैन राणा

मुंबईत झालेल्या **26-11** च्या दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर हुसैन राणाला भारताच्या ताब्यात देण्याचा निर्णय अमेरिकेच्या अपील न्यायालयानं दिला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात हस्तांतरणाचा करार असल्यानं, सध्या अमेरिकेच्या लॉस एंजलिस इथल्या तुरुंगात तहव्वूर राणाचं हस्तांतरण भारताकडे होऊ शकते असा निकाल न्यायालयानं दिला आहे. **2008** मध्ये झालेल्या या दहशतवादी हल्ल्यात **160** हून अधिक लोक मारले गेले होते. लष्कर-ए-तैय्यबाचा दहशतवादी डेव्हिड हेडली आणि पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आयएसआयशी संबंधित असल्याचा आरोपही तहव्वुर राणावर आहे.

भारतीय वैद्यकीय संघटना

आरोग्य सेवा क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी कायदा करण्याची विनंती भारतीय वैद्यकीय संघटनेनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे.सर्व रुग्णालयांमध्ये सुरक्षेसंबंधीचे नियम विमानतळांवरच्या नियमांइतके कठोर करावेत, सर्व रुग्णालयं सुरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करावी आणि योग्य ती सुरक्षाव्यवस्था त्यांना पुरवली जावी, असंही या पत्रात म्हटलं आहे. दरम्यान या प्रकरणी सीबीआय आज संशयित आरोपी संजय रॉय याची मानसशास्त्रीय चाचणी घेणार आहे.

खासदार देवरा

महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात देशात अग्रेसर ठरला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी मदतीचा हात सढळ सोडला असून गेल्या चार महिन्यात एक लाख कोटींची गुंतवणूक राज्यात झाली आहे. मेट्रो प्रकल्पांसाठी १५ हजार कोटींचा निधी मंजूर केल्यामुळे जगातील सर्वात मोठे मेट्रोचे जाळे मुंबई एमएमआर रिजनमध्ये विणले जात असल्याचं शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी सांगितलं. मुंबईत बाळासाहेब भवन इथं आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. केंद्र सरकारनं राज्याला काय दिलं असं विचारणाऱ्या विरोधकांवर खासदार देवरा यांनी सडेतोड उत्तर दिलं. मागील चार महिन्यांत वाढवण बंदरासह विविध प्रकल्पातून महाराष्ट्राला एक लाख कोटींची गुंतवणूक प्राप्त झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुणे आणि ठाण्याच्या मेट्रो प्रकल्पांना १५ हजार कोटींचा निधी मंजूर केला आहे. जगातील

सर्वात मोठे मेट्रोचे जाळे महाराष्ट्रात आहे याचा आम्हाला गर्व असल्याची भावना खासदार देवरा यांनी यावेळी व्यक्त केली.

बसप

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष मायावती यांनी केंद्रातील सहसचिव, संचालक आणि उपसचिव अशा ४५ उच्च पदांवर थेट भरतीच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केला आहे. या कारवाईमुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित राहावे लागेल, असं त्या म्हणाल्या. या सरकारी नियुक्त्यांमध्ये एससी-एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील लोकांना त्यांच्या कोट्याच्या प्रमाणात नियुक्ती दिली गेली नाही, तर ते थेट संविधानाचं उल्लंघन असेल, असं त्यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. कोणतेही नियम न बनवता या उच्च पदांवर थेट नियुक्त्या करणे हे भाजप सरकारची मनमानी आहे, जे बेकायदेशीर आणि घटना बाह्य आहे असंही त्यांनी नमूद केलं.

ओबीसी/प्रा.लक्ष्मण हाके

बांटिया आयोगाच्या अहवालानंतर ओबीसींच्या ५६ हजार जागा कमी झाल्या आहेत. या आयोगाने राज्यात ओबीसींची संख्या कमी झाल्याचा अहवाल दिला आहे. तो अहवाल कोणत्या आधारे दिला याचा शोध घेणे गरजेचे आहे. त्यामुळे आता ओबीसींना आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी लढावे लागणार आहे. मराठ्यांनी राज्यात सुरू केलेली आरक्षणाची लढाई ही वर्चस्ववादाची असल्याची टीका मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य प्रा. लक्ष्मण हाके यांनी केली.नांदेड जिल्ह्यातील भोकर येथे आज ओबीसी आरक्षण बचाव मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात ते बोलत होते.

मविप पुरस्कार

मराठी विज्ञान परिषदेतर्फे विज्ञान आणि तंत्रज्ञानक्षेत्रातल्या योगदानासाठी दिला जाणारे ‘मविप जीवन गौरव पुरस्कार’ जाहीर करण्यात आले आहेत. यावर्षी डॉ. रघुनाथ माशेलकर पुरस्काराकरता प्रा. रोहिणी गोडबोले आणि डॉ.अजय सूद, यांची तर डॉ.कमला सोहोनी पुरस्काराकरता डॉ. माधव गाडगीळ, आणि डॉ.महताब बामजी, यांची निवड झाली आहे. मराठी विज्ञान परिषदेच्या ५९व्या वार्षिक अधिवेशनात १६नोव्हेंबर रोजी हे पुरस्कार प्रदान केले जातील.

## चंद्रपूर वन प्रबोधिनी

राष्ट्रीय नागरी सेवा प्रशिक्षण संस्थांच्या (**NSCSTI**) मानकानुसार चंद्रपूर वन प्रबोधिनीला 19 डिसेंबर 2023 ते 18 डिसेंबर 2025 या कालावधीकरीता उत्कृष्ट थ्री स्टार मानांकन प्राप्त झालं आहे. चंद्रपूर वन प्रबोधिनीच्या नागरी सेवा प्रशिक्षणातील उत्कृष्टतेची दखल घेऊन क्षमता निर्माण आयोगाने ही मान्यता प्रदान केली आहे. ज्यामुळे वन अधिकारी, पदाधिकारी यांच्या प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्याच्या प्रक्रियेत एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या डेहराडूनमधील इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी सोबतच चंद्रपूर वन प्रबोधिनीला आता भारतातील 14 वन प्रशिक्षण संस्थांपैकी "उत्कृष्ट" श्रेणीमध्ये मान्यता मिळाली आहे. हे मानक "मिशन कर्मयोगी" उपक्रमाचा एक भाग आहेत, ज्याचा उद्देश भविष्यातील नागरिक सेवेला योग्य मानसिकता, कौशल्य आणि ज्ञान विकसित करणे असा आहे.

## जेएनयू / कुसुमाग्रज अध्यासन केंद्र

दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विख्यात मराठी साहित्यिक कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांच्या नावाने मराठी भाषेचं अध्यासन सुरू करण्यासाठी निधी देण्यात येईल, तसंच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ऐतिहासिक वास्तूचं जतन करण्यासाठी आवश्यक सहकार्य केलं जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुण्यात केलं. दिल्ली इथं होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा कार्यारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. दिल्लीत ७० वर्षांनंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणं ही महाराष्ट्रासाठी, मराठी साहित्यप्रेमींसाठी अभिमानाची गोष्ट आहे. अशा संमेलनांच्या माध्यमातून मराठी भाषेचं मोठेपण जगभरातल्या लोकांना कळायला हवं, असं शिंदे यांनी सांगितलं. हे संमेलन सर्वांनी मिळून यशस्वी करावं, असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

## एसटीचे 'जागा दाखवा' अभियान

सध्या एसटीमध्ये "महिला सन्मान योजने" अंतर्गत लाखो महिला दररोज एसटीतून 50% तिकीट दरात प्रवास करीत आहेत. अक्षरा केंद्र या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने एसटीने जागा दाखवा हा प्रबोधनात्मक संदेश सर्व प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याचा व त्यातून जनजागृती करण्याचा उपक्रम राबविण्याचं ठरविलं आहे. त्यानुसार प्रत्येक बसस्थानकावर, समाज माध्यमाच्याद्वारे एसटीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एसटीच्या कर्मचाऱ्यांना विविध चित्रफिती द्वारे महिलांचा प्रवासादरम्यान

सन्मान करावा असा प्रबोधनात्मक संदेश दिला जाणार आहे. गर्दीच्या ठिकाणी होणारी महिलांची छेडखानी, अपमानास्पद वागणूक, अशा गैर प्रकारांना आळा घालण्यासाठी हे अभियान चालवण्यात येणार असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्त संस्थेनं म्हटलं आहे.

मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा

मराठी चित्रपटसृष्टीसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मानाचा समजला जाणारा राज्य शासनाचा मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा यंदा वरळीच्या डोम एसव्हीपी स्टेडियममध्ये २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. शासनामार्फत ५८ आणि ५९ वा राज्य मराठी चित्रपट पुरस्कार यंदा एकाच वेळी प्रदान केले जाणार आहेत.

हवामान

येत्या काही तासांत यवतमाळ, अकोला, अमरावती, नागपूर तसंच वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोलीच्या काही भागांत विजांच्या कडकडाटांसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

****